**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०५ .२०)**

**शनिवार दिनांक १० मे २०२५**

**ठळक बातम्या**

१. पश्चिम सीमेजवळ पाकिस्तानचे हल्ले भारतानं यशस्वीपणे रोखले.

२. जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबाचे पाच दहशतवादी ऑपरेशन सिंदूरमध्मये ठार.

३. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश दरम्यान तापी खोरे, मेगा रिचार्ज प्रकल्पाच्या करारावर आज होणार स्वाक्षऱ्या; प्रकल्पामुळे नागपूर शहराची भागणार तहान .

४. वेल्डिंग तंत्रज्ञान आणि बॉयलर सिस्टीमवर उदया नागपुरात परिषदेचं आयोजन; सुमारे बारा लाख वेल्डरची कमतरता यावर, होणार मंथन.

---------------------------------------

**वार्ताहर परिषद**

पाकिस्तानं सातत्यानं करत असलेली घुसखोरी आणि ड्रोन हल्ल्यांना, भारतानं चोख प्रत्युत्तर दिलं आहे. भारतीय हवाई दलाच्या विमानांनी, हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या शस्त्रांचा वापर करत, पाकिस्तानच्या, रफिक्की, मुरीद, चक्लाला, रहिमयार खान या ठिकाणची लष्करी आणि नियंत्रण केंद्रं, रडार तसंच शस्त्र साठ्यांवर हल्ले करत, ती उद्धवस्त केल्याची माहिती आज, नवी दिल्लीत झालेल्या विशेष वार्ताहर परिषद देण्यात आली. परराष्ट्र सचिव, विक्रम मिसरी, कर्नल सोफिया कुरेशी, विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी ही वार्ताहर परिषद घेतली.पाकिस्ताननं आज पहाटे, दीडच्या सुमारास पुन्हा एकदा, भूज, पठाणकोट, भटिंडा, उधमपूर, श्रीनगर आणि अवंतीपूर भागातली, आरोग्य केंद्रं, शाळा, हवाई आणि लष्करी तळ तसंच नागरी वस्त्यांवर ड्रोन हल्ले करायचा प्रयत्न केला. भारतीय लष्करनं हे हल्ले, यशस्वीरित्या परतवल्याची माहिती, कर्नल कुरेशी यांनी दिली. तसंच भारतीय हवाई दलाचं, सिरसा इथलं केंद्र उद्धवस्त केल्याचा पाकिस्ताननं केलेला दावा, पूर्णपणे चुकीचा असून, हे केंद्र पूर्ण क्षमतेनं सुरू असल्याचं सांगत, त्यांनी तिथली आजची छायाचित्रं दाखवली.पाकिस्तान सीमाभागात मोठ्या प्रमाणात सैन्याची जमवाजमव करत असल्याचं यावेळी कुरेशी यांनी सांगितलं. पाकिस्तानकडून होत असलेल्या या कारवाईला, भारतीय हवाई दलानं तातडीनं प्रत्युत्तर दिलं. पाकिस्तानची रडार व्यवस्था आणि तांत्रिक तळ लक्ष्य करत, ते उद्ध्वस्त केल्याची माहिती, विंग कमांडर, व्योमिका सिंग यांनी दिली. भारतातले सुरतगड आणि सिरसा इथले हवाई

दलाचे तळ तसंच, एस-४०० ही हवाई सुरक्षा प्रणाली नष्ट केल्याचा, पाकिस्तानचा दावा, सपशेल खोटा असल्याचंही, सिंग यांनी सांगितलं.दरम्यान, सीमावर्ती भागात पाकिस्तानकडून सातत्यानं गोळीबार केला जात असून, यात राजौरीचे अतिरिक्त जिल्हा आयुक्त, राज कुमार थापा यांच्यासह दोन नागरिकांचा मृत्यू झाल्याची माहिती, परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी दिली. पाकिस्तान सातत्यानं, चुकीच्या बातम्या पसरवत असल्याचंही, मिसरी यांनी नमूद केलं.

---------------------------------------

अफवा

पाकिस्तानच्या कुरापती, भारतानं रोखल्यामुळे, पाकिस्तान डिजिटल माध्यमांवर अफवा आणि चुकीची माहिती पसरवत असून, समाज माध्यमांवर बनावट प्रतिमा, चित्रफिती प्रसृत करत, पाकिस्तान माध्यमांची आणि लोकांची दिशाभूल करत आहे.पाकिस्तान ज्या पद्धतीनं, त्यांच्या देशात दहशतवादाला खतपाणी घालत आहे त्याच पद्धतीनं, डिजिटल व्यासपीठावर बनावट बातम्या पसरवत आहे. भारताच्या चोख प्रत्युत्तरामुळं, नैराश्यानं ग्रासलेला पाकिस्तान, खोट्या बातम्यांचा प्रसार करत जनतेची, माध्यमांची दिशाभूल करत आहे.भारतीय सैनिकांना पकडल्याचं किंवा भारतीय संरक्षण प्रणाली नष्ट केल्याचा खोटा प्रसार, पाकिस्तानी समाज माध्यमं आणि वाहिन्यांवर केला जात आहे तसंच, भारतीय प्रत्युत्तरामुळे, पाकिस्तानचं झालेलं नुकसानही लपवण्याचा प्रयत्न होत आहे.भारतीय महिला, वायूदल अधिकाऱ्याला पकडल्याचा एक व्हिडिओ, पाकिस्तानी समाज माध्यमांवर पसरवला जात आहे. हिमालयीन क्षेत्रात तीन भारतीय फायटर विमानं पाडल्याचा बनाव, २०१६चं एक छायाचित्र दाखवून केला जात आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये, एका फायटर जेटमधून, भारतीय पायलटला ताब्यात घेतल्याचं ही खोटं वृत्त, पसरवलं जात आहे.तसंच भारताच्या, ननकाना साहिब गुरुद्वारावर, ड्रोन हल्ला केल्याचंही, सांगितलं जात आहे. तसंच पाकिस्तानच्या सायबर हल्ल्यामुळे, भारताचा ७० टक्के वीज पुरवठा बंद पडल्याचा बनावही, केला जात आहे.अशा प्रकारचा कोणताही मजकूर आढळल्यास, तत्काळ पत्र सूचना कार्यालयाला, याची माहिती द्यावी, 87997 11259 या व्हॉट्सअप क्रमाकांवर, किंवा social-media@pib.gov.in या मेलवर, असा मजकूर पाठवावा असं, आवाहन करण्यात आलं आहे.

---------------------------------------

दहशतवादी ठार

जैश-ए-मोहम्मद आणि लष्कर-ए-तैयबा या दहशतवादी संघटनांचे पाच दहशतवादी, ऑपरेशन सिंदूरमध्ये मारले गेल्याचं, अधिकृत सूत्रांनी सांगितलं. मुदस्सर खादियान

खास उर्फ अबु जुंदाल, मौलाना मसूद, अझहरचा मेव्हणा, हाफिज मुहम्मद जमील, मोहम्मद युसुफ अझहर, खालीद उर्फ, अबु अकाशा आणि मोहम्मद हसन खान अशी त्यांची नावं आहेत. गेल्या गुरुवारी, राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर मोहिमेत, ते ठार झालेत.

----------------------------------------

बैठक

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज, नवी दिल्ली इथं आपल्या निवासस्थानी, संरक्षण मंत्री, राजनाथ सिंह आणि तिन्ही सेना दलांच्या प्रमुखांची, बैठक घेतली. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार, अजित डोवाल देखील, या बैठकीला उपस्थित होते.भारतानं पाकिस्तानच्या कुरापतींना, प्रत्युत्तर देण्यासाठी, सुरु केलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर, ही बैठक झाली.

----------------------------------------

मॉक ड्रील

सध्या देशभरात, युद्ध जन्य परिस्थितीला भारत सामोरा जात असताना कुठली आपत्कालीन घटना घडल्यास कशा पद्धतीनं कृती करावी यासाठी वेगवेगळ्या विभागामार्फत, मॉक ड्रिल घेतली जात आहे. याच पार्श्वभूमीवर, दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या, उत्तर नागपूरच्या मोतीबाग परिसरातील रुग्णालयातही अशाच पद्धतीची मॉकड्रिल घेण्यात आली.यावेळी आपात्कालीन परिस्थितीमध्ये आग लागली असो की हल्ला झालेला असो या सगळ्या परिस्थितीत कशा पद्धतीनं कृती केली पाहिजे तसंच रुग्णालयातील रुग्णांना, हलवताना काय काळजी घ्यायची, स्वतः रुग्णालयातील स्टाफनं कशा पद्धतीनं जमिनीवर झोपून, धूर असल्यास, डोळे बंद करून, जमिनीवर झोपून जावं, स्वतःचा जीवासह, रुग्णांचा जीव वाचायला काय केलं पाहिजे, या सगळ्या संदर्भातली माहिती, यावेळेस देण्यात आली.

----------------------------------------

सतर्कतेचा आदेश

भारत-पाकीस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर जिल्हयातील सर्व यंत्रणांनी अधिक दक्ष राहावे. विभाग प्रमुख व कर्मचाऱ्यांनी कोणत्याही क्षणी आवश्यकता भासेल तिथे उपस्थित राहण्याच्या दृष्टीने मुख्यालयाच्या ठिकाणी राहणे बंधनकारक आहे. सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सुट्टया रद्द करण्यात आल्या असून प्रशासकीय पातळीवर आवश्यकत्या सर्व उपाययोजना केलेल्या आहेत. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता जिल्हा प्रशासनातर्फे ज्या काही सूचना केल्या जातील त्याचे

कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून काटेकोरपालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी केले.

---------------------------------------

आंतरराज्य नियंत्रण मंडळ बैठक

महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश आंतरराज्य नियंत्रण मंडळाची २८वी बैठक आज मध्यप्रदेशची राजधानी भोपाळ इथं होत आहे. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव  उपस्थित आहेत. जलविद्युत आणि जलसिंचन क्षेत्रातल्या प्रकल्पांवर बैठकीत चर्चा होईल. तापी खोरे मेगा रिचार्ज प्रकल्पाच्या सामंजस्य करारावर आज स्वाक्षऱ्या होणार आहेत. या प्रकल्पामुळे  महाराष्ट्राला १९ पूर्णांक ३६ शतांश टीएमसी पाणी मिळणार असून मध्यप्रदेशला ११ पूर्णांक ७६ शतांश टीएमसी पाणी मिळणार आहे. तापी नदीच्या तीन प्रमुख प्रवाहातून कालवे काढून संबंधित क्षेत्राच्या कानाकोपऱ्यात पाणी पोहोचेल. या प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्रातल्या जिल्ह्यांना लाभ मिळणार असून विशेषतः नागपूर शहराची तहान भागणार आहे. ही योजना जगातली सर्वात मोठी जल पुनर्भरण योजना असल्याचं मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी सांगितलं. महाराष्ट्रातली २ लाख ३४ हजार ७०६ हेक्टर जमीन तर मध्यप्रदेशातली १ लाख २३ हजार ८२ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पात कोणत्याही गावाचं विस्थापन होणार नाही, असं यादव यांनी सांगितलं. ही योजना केंद्रसरकारच्या जलसिंचन योजनांमधे समाविष्ट करावी, अशी विनंती आपण केंद्रसरकारला करणार असल्याचं ते म्हणाले.

---------------------------------------

निधन

आकाशवाणी नागपूरचे, माजी केंद्र संचालक, गुणवंत थोरात यांचं आज सकाळी, नागपूरच्या एका खाजगी इस्पितळात निधन झालं. ते 78 वर्षाचे होते. आपल्या कार्यकाळात त्यांनी, नागपूर, यवतमाळ, सोलापूर इथं काम केलं होत.त्यांच्या कार्यकाळात, आकाशवाणी नागपूरवरून, रामनवमीच्या शोभा यात्रेचं थेट प्रसारण, त्याच प्रमाणे यवतमाळ आकाशवाणीवर देखील, अनेक सृजनशील उपक्रम राबविण्यात आले.वाडी इथल्या त्यांच्या निवास स्थानावरून उद्या त्यांची अंत्ययात्रा अंबाझरी घाटावर, सकाळी अकरा वाजता निघणार आहे.

---------------------------------------

हवामान

हवामान आज पासून पूर्ण आठवडा, संपूर्ण विदर्भामध्ये, विजेच्या कडकडाटासह तसंच, सोसाट्याच्या वाऱ्यासह, हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता, हवामान खात्यानं वर्तवली आहे.दरम्यान आज सर्वात जास्त तापमानाची नोंद, नागपूर इथं 40.6 अंश सेल्सिअस करण्यात आली.

---------------------------------------

खेलो इंडिया

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्र ६६ पदकांची कमाई करत पदक तालिकेत अव्वल स्थानावर आहे. यात २४ सुवर्ण, २१ रजत आणि २१ कांस्यपदकांचा समावेश आहे. कर्नाटक ३८ तर राजस्थान २१ पदकांसह दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत.

---------------------------------------

वेल्डिंग परिषद

औद्यागिक क्षेत्रात होणाऱ्या प्रगतीमुळे विविध उद्योगासमवेत अधिक तंत्रकुशल कर्मचाऱ्यांची कमतरता मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. सूमारे बारा लाख वेल्डरची कमतरता असल्याचे एका अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. या संधीवर राज्यातील युवकांना स्वार होता यावे, त्यांना या क्षेत्रातील प्रगतीचे नवे मार्ग मिळावे, या क्षेत्रातील आव्हानांबाबत चर्चा व्हावी याउद्देशाने उदया 11 मे रविवार रोजी हॉटेल सेंटर पाईंट एक दिवसीय “बीडब्ल्युयु वेल्ड कनेक्ट” परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेचे उद्घाटन कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते होणार आहे. राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. औद्योगिक क्षेत्राच्या नवनवीन विस्तारामध्ये बाष्पक (बॉयलर ) क्षेत्रही अधिक व्यापक होत चालले आहे. विस्तारत चाललेल्या या क्षेत्रातील उद्योजक, बॉयलर निर्माते, तंत्रज्ञ आणि महाराष्ट्र शासनाचे बाष्पके संचालनालय यांनी एकत्र येऊन ही परिषद आयोजित केली आहे. बाष्पके क्षेत्रातील सुरक्षितता, तांत्रिक प्रगती, वेल्डिंग क्षेत्रातील तंत्रकुशलता, आवश्यक रोजगार व संधी बॉयलर बाबतचे प्रमाणिकरण, डिजीटल तंत्रज्ञानाचा या क्षेत्रातील प्रभावी वापर, ऊर्जा क्षेत्रातील आव्हाने आदी विषयावर जागतिक पातळीवरचे तज्ज्ञ यांच्यात विचार मंथन होणार आहे.

---------------------------------------